# साखळी महाविद्यालयात १९ रोजी 'कथासंधी'

**केरी : पुढारी वृत्तसेवा**

साहित्य अकादमीतर्फे शुक्रवार दि. १९ जुलै रोजी साखळी येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात विद्यालयाच्या कोकणी आणि हिंदी विभागाच्या सहकार्याने सकाळी १० वा. महाविद्यालयाच्या सभागृहात 'कथासंधी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला कोकणीचे ज्येष्ठ साहित्यिक तथा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते एन. शिवदास हे आपली कथा सादर करून कथेच्या निर्मिती प्रक्रियेविषयी उपस्थितांशी चर्चा करणार आहेत.